# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित आवश्यक

## याज्ञसेन पाटणकर : पाटण येथील कार्यक्रमात मत व्यक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण** : 'सध्या जागतिकीकरणाच्या काळात रोजगाराच्या संधीचे स्वरूप बदलले आहे. रोजगाराच्या नवनवीन संधीबाबत माहिती नसल्याने किंवा आवश्यक कौशल्य नसल्याने विद्यार्थी रोजगार किंवा उद्योगापासून वंचित राहत आहेत. विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे,' असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी. डी. कॉलेज, पाटण अंतर्गत आयक्यूएसी विभाग, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगारवर्धन आणि युवा उपजीविका महिंद्रा प्राइड क्लासरूमतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी स्वाती मोरे, आसावरी कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, डॉ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. स्नेहा कुंभार, प्रा. एम. एस. आलदार उपस्थितीत होते.

याज्ञसेन पाटणकर म्हणाले, 'या वेगवान स्पर्धात्मक युगात आपल्या क्षमतेवर टिकून राहण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आत्ताच्या ऑनलाइन युगात मोबाइलचा वापर अनिवार्य आहे; परंतु तो शिक्षणासाठी वापर केला पाहिजे. आपल्या विषयाची माहिती घेण्यासाठी त्याचा वापर केला पाहिजे. आजच्या संगणकीय युगात पेपर लेस काम करता आले पाहिजे. त्यासाठी माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी ई-मेलचा वापर करावा.'

स्वाती मोरे म्हणाल्या, 'जी कौशल्ये आता शिकविली आहेत. त्याचा आयुष्यात वापर केल्यास नक्कीच फायदा होईल. ग्रामीण भागातील मुलींसाठी असे विविध कौशल्य शिकणे आवश्यक असल्याने त्याचा फायदा भविष्यात नक्की होईल.'

कार्यक्रमाचे प्रा. डॉ. स्नेहा कुंभार यांनी प्रास्ताविक केले. भाग्यश्री हिरवे व काजल पवार यांनी सूत्रसंचालन केले. विशाखा गुजर हिने आभार आभार मानले.



पाटण येथे आयोजित कार्यक्रमात याज्ञसेन पाटणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. स्नेहा कुंभार, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, डॉ. एच. व्ही. काटे, प्रा. एम. एस. आलदार उपस्थित होते. (छाया : प्रवीण जाधव)